**<u>निशाणी क्र.४३ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.२ राधाकिसन महादु चिकटे यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेऊन तशी दुरूस्ती करण्याकरीता केलेला आहे.

०२. वादी यांचे अर्जातील कथनानुसार, मयत वादी क्र.२ राधाकिसन महादु चिकटे हे दिनांक २३.१०.२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे, मयत वादी यांचे वारसांना सदर दाव्याचे कामी वादी म्हणून सामील करणे गरजेचे व न्यायाचे झाले आहे. सबब, मयत वादी क्र.२ राधाकिसन महादु चिकटे यांचे वारस अभिलेखावर घेण्यास व तशी दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेबाबत वादी यांनी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर त्यांचा आक्षेप नसल्याचे कथन केले आहे.

०४. प्रस्तुतचा अर्ज त्यावरील शपथपत्र व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. मयत वादी क्र.सदर अर्जावर यांचा मृत्यू दिनांक २३.१०.२०२२ रोजी झाल्याचे दिसून येत आहे. प्रस्तुत दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता दाव्यामध्ये सर्व आवश्यक पक्षकार सामील करुन घेणे गरजेचे आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ क्रम ३ चा विचार करता जर वादी याचा मृत्यू झाला तर त्याचे वारसांना प्रतिवादी विरुध्द दावा करण्याचा अधिकार टिकून राहिला तर वादीच्या कायदेशीर वारसांना पक्षकार करणे गरजेचे आहे. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता दावा मिळकतीबाबत वादीचे वारसांविरुध्द दावा करण्याचा अधिकार प्रतिवादीला आहे, असे दिसून येत आहे. प्रस्तुतचा दावा गुणदोषांवर निकाली काढण्यासाठी मयत वादी यांच्या कायदेशीर वारसांना वादी म्हणून सामील करुन घेणे न्यायोचित दिसून येत आहे. यासर्व बाबींचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

०१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी अर्जात नमुद केलेप्रमाणे वादी क्र.२ राधाकिसन महादु चिकटे सदर अर्जावर यांचे वारस अभिलेखावर घेवून तशी दुरुस्ती १४ दिवसांचे आत करावी. तसेच, दुरुस्त दाव्याची प्रत व आवश्यक प्रती तदनंतर तात्काळ सादर कराव्यात.

०३. वादी यांनी उपरोक्त अर्जाच्या खर्चाची एकत्रीत रक्कम रुपये १००/– (रक्कम रुपये शंभर फक्त) प्रतिवादी यांना द्यावी.

स्वाक्षरित/–

दिनांकः ०५.०८.२०२४. ( श्रीमती आर. व्ही. पाटील )
भोकरदन. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, भोकरदन.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघूलेखकाचे नावः यु. आर. दसरे
न्यायालयाचे नावः दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन
मा. साहेबांनी चेक केले
व पी.डी.एफ. दिनांकः ०५.०८.२०२४.

स्वाक्षरित/–
लघुलेखकाची सही